महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाचे शासकीय ॲम्बेसेडर वाहनाची उच्चतम दर प्राप्त निविदानुसार विक्री करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : राअआ-२०१९/प्र.क्र.६०/का.९,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दि. ०६ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- १) शासन परिपत्रक वित्त विभाग,डीएफपी -१०९१/प्र.क्र.४/विनियम,दि. १८/०६/१९९१
२) शासन परिपत्रक वित्त विभाग,विआप्र -१०००/प्र.क्र.३१/विनियम,दि. १५/०६/२००१
३) शासन परिपत्रक वित्त विभाग,डीएफपी -१०१६/प्र.क्र.७/विनियम,दि.२२/०६/२०१६
४) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा,मुंबई यांचे दि. २३/१०/२०१३ चे पत्र
५) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांचे दि. १५/०२/२०१८ चे ज्ञापन
६) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांचे दि. १५/०२/२०१९ चे पत्र

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाचे शासकीय ॲम्बेसेडर वाहन क्रमांक-एमएच-०२-केए-८२८२चे १७वर्षे झाली असून सदर वाहन भंगार/जीर्ण अवस्थेत आहे. त्यानुसार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा,मुंबई यांच्या उपरोक्त संदर्भ क्र.४येथील दि. २३/१०/२०१३च्या पत्रान्वये या वाहनाचे आयुष्यमान पूर्ण झाले असून सदर वाहन यापुढे दुरुस्त करुन वापरात ठेवणे आर्थिकदृष्टया किफायतशीर ठरणार नाही. सबब ते निकामी ठरवून मोडीत काढण्यास हरकत नाही असे अभिप्राय दिले आहेत. त्यामुळे उपरोक्त सदंर्भ क्र.५ अन्वये सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी त्यांचा प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन दि.१५/०२/२०१८च्या ज्ञापनान्वये वाहन क्रमांक- एमएच-०२-केए-८२८२चे निर्लेखन केलेले आहे. सबब, उपरोक्त शासन परिपत्रक वित्त विभाग, (१) क्र. डीएफपी -१०९१/प्र.क्र.४/विनियम, दि.१८/०६/१९९१, (२) क्र. विआप्र-१०००/प्र.क्र.३१/विनियम, दि.१५/०६/२००१, व (३) क्र. डीएफपी-१०१६/प्र.क्र.७/विनियम, दि.२२/०६/२०१६ मधील मार्गदर्शक सूचनानुसार विक्री करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नियंत्रक,शासकीय परिवहन सेवा,मुंबई यांचे संदर्भ-४ येथील दि.२३/१०/२०१३च्या पत्रान्वये दिलेल्या अहवालानुसार तसेच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ५ येथील दि.१५/०२/२०१९ चे विनंतीपत्रानुसार महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग,मुंबई या कार्यालयाचे शासकीय ॲम्बेसेडर वाहन क्रमांक-एमएच-०२-केए-८२८२करिता दुसऱ्या निविदातील प्राप्त उच्चतम दर रु. २१,५५५/- (अक्षरी रुपये एकवीस हजार पाचसे पंचावन्न फक्त) इतक्या किंमतीने विक्री करण्यास पुढील अटींच्या अधीन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

१) उपरोक्त वाहनाची विक्री करताना शासन परिपत्रक वित्त विभाग, (१) क्र. डीएफपी -१०९१/ प्र.क्र.४/ विनियम, दि.१८/०६/१९९१, (२) क्र. विआप्र-१०००/ प्र.क्र.३१/ विनियम, दि.१५/०६/२००१, व (३) क्र. डीएफपी-१०१६/प्र.क्र.७/ विनियम, दि.२२/०६/२०१६मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

२) उपरोक्त वाहनाची विक्री केल्यानंतर आलेल्या विक्रीमुल्याची रक्कम तातडीने शासकीय तिजोरीत संकीर्ण वसूली (जमा) खाती जमा करण्यात यावी. सदर वाहनाची विक्री झाल्यानंतर१५ दिवसांच्या आत शासन परिपत्रक क्र. डीएफपी-१०६१/१२१९५/VII, दिनांक २८ फेब्रुवारी,१९६२ सोबतच्या **प्रपत्र - अ** व **ब** मध्ये शासनास माहिती सादर करावी.

३) अल्पसंख्याक विकास विभागाच्या वाहनांच्या आढावा संदर्भातील प्रस्तावात वित्त विभागाच्या विनियम कार्यासनाने दिलेल्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाचे उपरोक्त वाहन हे अतिरिक्त आहे. त्यामुळे सदर वाहनाच्या बदल्यात नवीन वाहन खरेदी करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९०६१७१३५७३९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.09.06 17:19:26 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
२) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर,
३) संचालक, लेखा व कोषागारे,
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
७) कक्ष अधिकारी, (विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
८)कक्ष अधिकारी, (का-७) , अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
९) निवडनस्ती (कार्यासन-९)